**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**सर्वसाधारण मुळ दिवाणी अधिकारिता**

**दावा क्रं.३३७०/२००९ मधील अंतरिम अर्ज क्रमांक २०४७/२०१९**

**मेटल रोलिंग वर्क्स लि. .... अर्जदार/वादी**

**विरुध्द**

**हरेश कपाडीया आणि इतर .... प्रतिवादी**

**श्री.प्रेम गिडवानी,श्री.अरविंद तराळ व्दारा निर्देशित**

**श्री.प्रेरक ए.एस.शर्मा, प्रतिवादी क्र.१ साठी.**

**श्री.ए.एस.खांडेपारकर आणि श्री.मुकुंद माडेकर, माडेकर अँड कंपनी यांचेव्दारे निर्देशित प्रतिवादी क्रमांक २ आणि ४ साठी.**

**न्यायमंच : न्यायमूर्ती एन.जे.जमादार**

**दिनांक : २८ फेब्रुवारी २०२३**

**न्यायनिर्णय :-**

१. अर्जदार/वादी यांनी १ ऑक्टोबर २०१७ रोजीचा आदेश रद्द ठरवून मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल करण्यास १७०३ दिवसांचा झालेला विलंब माफ होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे, ज्याव्दारे दावा चालवू न शकल्यामुळे तो खारीज केल्याचे आदेश रद्द ठरविण्यात येऊन गुणवत्तेच्या आधारावर निर्णया दाखल सदरचा दावा पुनर्स्थापित करण्यात यावा.

२. श्री.साठे यांना पक्षाघाताचा झटका आल्याने त्यांची प्रकृती चांगली नव्हती. श्री.साठे यांच्या सहकारी कु. लता वाधवानी ज्यांनी श्री.साठे यांच्याबरोबर वकीलपत्र दाखल केले होते, त्यांनी नंतर स्वतः ची स्वतंत्र प्रॅक्टिस (वकिली) सुरु केली. अर्जदार/वादी कंपनीचे मेसर्स लल्लूभाई अमिचंद लिमिटेडमध्ये विलिनीकरण झाले.

३. अर्जदाराचे म्हणणे आहे की, श्री.साठे यांच्या प्रकृतीमुळे तसेच अर्जदाराचे कंपनीचे मेसर्स लल्लूभाई अमिचंद लिमिटेड सोबत विलीनीकरण झाल्यामुळे दाव्याचा मागोवा घेणे शक्य झाले नाही. ऑगस्ट २०१९ च्या अखेरच्या आठवडयात, काही फौजदारी प्रकरणांची जबाबदारी असलेल्या एका वकिलाने विचारणा केली तेव्हा अर्जदाराने त्वरित खटल्याचा टपपा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. असे निदर्शनास आले की, १ ऑक्टोबर २०१५ च्या आदेशानुसार दावा न चालवण्यामुळे न्यायालयाने दावा फेटाळलेला आहे. अर्जदाराने कामकाजाच्या प्रमाणित प्रती त्वरीत मिळण्यासाठी मागणी केली आणि हा अंतरिम अर्ज दाखल केला.

४. अर्जदाराचे म्हणणे आहे की, वरील आदेश रद्द करण्यासाठी अर्जदाराने १५०३ दिवसांचा विलंब हेतुपुरस्सर केलेला नाही. माजी वकील श्री.साठे यांच्या आजारपणामुळे वादी यांची बाजू कोणीही मांडू शकले नाही, त्यामुळे विलंब माफ केला जावा आणि दावा पुनर्जीवित करण्यात यावा. अन्यथा गुणवत्तेवर योग्य असणा-या दाव्यात वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल.

५.		प्रतिवादी  क्रमांक २ आणि ४ च्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल केले. प्रतिवादी क्रमांक १ आणि ३ ने प्रतिवादी क्रमांक २ आणि ४ च्या वतीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील युक्तिवाद स्वीकारले आहेत.

६.		प्रतिवादी क्रमांक २ आणि क्रमांक ४ यांचा दावा आहे की, हा अर्ज पूर्णपणे चुकीचा आहे.  प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतूने हा अर्ज दाखल केला आहे. १५०३ दिवसांचा मोठा विलंब माफ करण्यासाठी पुरेसे कोणतेही कारण नाही.

७.		प्रतिवादी  क्रमांक २ आणि ४ यांचा युक्तिवाद आहे की, हा अर्ज पूर्णपणे खोटा आणि असमर्थनीय कारणांवर आधारित आहे. वादीने हजर न राहण्यासाठी श्री.साठे यांचे आजारपणाचे सांगितलेले कारण खोटे आहे. त्याचप्रमाणे, वादीचे मेसर्स लल्लुभाई अमिचंद लिमिटेड यांचे सोबत २०१२ मध्ये झालेल्या विलीनीकरणाचा सदर दाव्यात  हजर न राहण्याशी काहीही संबंध नाही.

८.		प्रतिवादी  क्रमांक २ आणि ४ स्पष्टपणे असा युक्तिवाद करतात की साठे यांच्या कथित आजाराचे कारण म्हणजे या वकिलाला पूर्णपणे दोष देण्याचा दुर्भावनापूर्ण प्रयत्न आहे.  या संदर्भातील वक्तव्ये निरर्थक आणि अस्पष्ट आहेत.  उलटपक्षी, १ ऑक्टोबर २०१५ च्या आदेशापूर्वी आणि तदनंतर श्री.साठे विविध न्यायालयांमध्ये नियमितपणे हजर होते, असे दर्शविणारे दस्ताऐवज उत्तरादाखल सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राला  जोडलेले आहे. सदर वस्तुस्थिती अर्जदाराच्या दाव्याला पूर्णपणे खोटे ठरवते की, श्री.साठे यांची प्रकृती खराब

असल्यामुळे, दावा जेव्हा सूचीबध्द झाला तेव्हा ते न्यायालयात हजर राहू शकले नाहीत.

९. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, कथित आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करण्यास सुमारे ७ वर्षे विलंब झाल्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. वादी कडून प्रतिवादीविरोधात अनेक फौजदारी खटले चालविले जात होते. ही बाब लक्षात घेता या निष्क्रियतेस अर्थ प्राप्त झाले आहे. कोणतेही योग्य स्पष्टीकरण नसल्यामुळे विलंब माफ करण्यायोग्य नाही.

१०. प्रतिवादींनी केलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर, वादी यांनी त्याचे माजी वकील श्री.साठे यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. श्री.साठे यांचे आजारपण हे वादी सुनावणीस उपस्थित न राहिल्याने आणि फेटाळण्यात आलेला दावा पुनर्जीवित करण्यासाठी अर्ज दाखल करण्यास विलंब होण्याचे प्रमुख कारण असून त्यासाठी श्री.साठे यांनी शपथेवर सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद १ आणि २ विचारात घेणे योग्य राहिल. ते खालील प्रमाणे आहे.

> ''१. मी ४० वर्षापासून वकील आहे. मी २००६ पासून पक्षाघाताने ग्रस्त आहे आणि माझा उजवा हात आणि उजवा पाय त्यामुळे प्रभावित झालेला असून मी माझा उजवा हात हलवू शकत नाही आणि मला
>
> चालायला देखील त्रास होते. मी डॉ.नारायण के.जेरेदेसाई यांचे दिनांक १३-०१-२०२३ चे वैधकिय प्रमाणपत्र सोबत जोडत आहे आणि सध्या मी त्यांच्या उपचाराधीन आहे.

२. मी या दाव्यात माझी तत्कालीन सहकारी लता वाधवानी यांच्या सोबत वादी यांची बाजू मांडत होतो. ज्यांनी नंतर त्यांचा वैयक्तिक वकिली व्यवसाय सुरु केला होता. त्यामुळे ३१ ऑक्टोबर २०१४ आणि १ ऑक्टोबर २०१७ रोजी दावा निकाली निघाला तेव्हा मी सुनावणीस हजर राहू शकलो नाही. माझ्या तब्येतीमुळे माझे या प्रकरणाकडे दुर्लक्ष झाले आणि त्या दिवशी मी सुनावणीस उपस्थित राहू न शकल्यामुळे हा दावा फेटाळला गेला''.

११. वरील युक्तिवादांच्या पार्श्वभूमीवर मी अर्जदार/वादी यांचे अधिवक्ता प्रेम गिडवानी आणि प्रतिवादी कमांक २ आणि४ चे अधिवक्ता ए.एस.खांडेपारकर यांचे म्हणणे ऐकले आहे. ३१ ऑक्टोबर २०१४ आणि १ ऑक्टोबर २०१७ रोजी या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांचे देखील मी अवलोकन केले आहे. ज्याव्दारे सदरचा दावा फेटाळण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी कोणीही वादीची बाजू मांडली नाही आणि बचाव पक्षाच्या वकिलांची उपस्थिती लक्षात घेऊन आणि युक्तिवाद पूर्ण झाल्यामुळे वाद मुद्दे निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, संबंधित पक्षकारांना दस्ताऐवज आणि संपूर्ण शोध आणि तपासणी यांचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

१२.	१ ऑक्टोबर २०१७ रोजी न्यायालयाने खालील आदेश दिला.

३१ ऑक्टोबर २०१७ रोजी जेंव्हा प्रकरणे सूचीबध्द् केले गेले आणि दस्तऐवजाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आणि संपूर्ण शोध आणि तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले, तेव्हा वादींतर्फे कोणीही उपस्थित नव्हते. आजही वादींतर्फे कोणीही हजर नाही.  त्यामुळे खटला फेटाळण्यात आला.

१३.	श्री.गिडवाणी यांनी सांगितले की, वादीला योग्यतेनुसार खटला निकाली काढण्याची योग्य संधी मिळावी, यासाठी उपरोक्त आदेश बाजूला ठेवणे आवश्यक आहे.  श्री.गिडवाणी यांनी असे निवेदन केले की, श्री.साठे हे अनेक दिवसांपासून आजाराने त्रस्त होते हे निर्विवाद आहे. श्री.साठे यांच्याकडून खटल्याचा टप्पा आणि तो खारीज करण्याबाबत कोणताही संवाद झाला नाही. अर्जदार / वादी पुर्नः स्थापनेसाठी न्यायालयात जाऊ शकत नाही. त्यामुळे विलंब झाला. श्री गिडवानी यांच्या म्हणण्यानुसार खटला  पुर्नः स्थापनेसाठी  प्रतिवादांना कोणताही पूर्वग्रह होणार नाही.

१४.	श्री.खांडेपारकर यांनी दावा पुन्हा सुरु करण्याच्या प्रार्थनेला तीव्र विरोध केला. श्री.खांडेपारकर यांनी अनेकअंगी सादरीकरण केले. प्रथमतः हा अर्ज खोटया दाव्यावर आधारित आहे की, श्री.साठे यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे विद्वान वकील प्रकरण पुकारण्यात आले तेव्हा न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. उपरोक्त आदेश पारित होण्याआधी आणि नंतर श्री.साठे विविध मंचासमोर हजर राहिल्याबाबतच्या कार्यवाहीच्या प्रमाणित प्रतींवर  न्यायालयाचे लक्ष वेधून घेत

श्री. खांडेपारकर विनंती करतील की, अर्ज विचारात घेण्यास पात्र नाही. दुसरे म्हणजे श्री.खांडेपारकर यांच्या म्हणण्यानुसार, अर्जाला प्राधान्य देण्यास १५०३ दिवसांचा दिर्घ आणि अवास्तव विलंब झाल्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. अशा प्रकाराचा विलंब सहजासहजी खपवून घेतला जाऊ शकत नाही. बरखास्तीचा आदेश बाजूला ठेवण्या बाबत अर्ज दाखल करण्यासाठी काल मर्यादा घालण्याचा उद्देश निश्चित आहे. एवढा मोठा विलंब कशामुळे झाला याचे समाधानकारक स्पष्टीकरण नसल्यामुळे न्यायालयाला विलंब माफ करणे समर्थनिय ठरणार नाही. अशी विनंती खांडेपारकर यांनी केली.

१५. पूर्वोक्त निवेदनाच्या पुष्टयर्थ श्रीयुत खांडेपारकर यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मज्जी सन्नेमा उर्फ संन्यासीराव विरुध्द रेड्डी श्रीदेवी आणि ईतर ( **A.I.R.2002 S.C.332** ) मधील न्यायनिर्णयावर प्रखर भर दिलेला आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अपिल करणेसाठी झालेल्या १०११ दिवसांचा विलंब माफ करण्यास नकार दिला. न्यायनिर्णयाच्या परि. ७ मध्ये अनेक न्यायनिर्णयांचा उल्लेख केला असून आणि प्रकरणातील तथ्यांना त्या न्यायनिर्णयांच्या निर्णय-मूलाधार ( **Ratio** ) लागू करुन सर्वोच्च न्यायालय या निर्णयावर पोंहचले की, १०११ दिवसांचा प्रचंड विनंब माफ करण्यात उच्च न्यायालयाने चूक केली आहे. न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ७ आणि ८ मध्ये म्हटले आहे कीः

‘‘७. ७. या टप्प्यावर, अपिल दाखल करण्यासाठी झालेला उशिरा बद्दलच्या या न्यायालयाच्या काही निर्णयांचा संदर्भ दिलेला असून ते खालीलप्रमाणे विचारात घेण्यांत आलेले आहेतः

७.१ रामलाल, मोतीलाल आणि छोटेलाल ( वरिलप्रमाणे ) प्रकरणात असे निरीक्षण करण्यात आले आणि मानण्यात आले कीः कलम ५ चे न्यायविवेचन करतांना दोन महत्वाच्या गोष्टी लक्षात घेणे योग्य आहे. पहिले की, अपिल करण्यासाठी विहित कालावधी संपुष्टात येणे हे हुकूमनामा-धारकाच्या बाजुने हुकूमनामा वादपक्षांसाठी बंधनकारक असल्याचाअधिकार निर्माण करणारे आहे. दुस-या शब्दात सांगायचे तर, जेंव्हा विहित कालमर्यादा संपुष्टात आली आहे आणि हुकूमनामाधारकाने मुदत कायदया अंतर्गत हुकूमनाम्याला आव्हानित करता येणार नाही असे मानण्याचा लाभ घेतला आहे आणि काल व्यपगत झाल्यामुळे हुकूम नामधारकाला मिळालेल्या या कायदेशीर अधिकाराला सहजपणे व्यतीत करता येणार नाही. दुसरे गृहीतक ज्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही ते म्हणजे जर उशिर माफ करण्यासाठी पुरेसे कारण दाखवलेले असल्यास, विलंब माफ करणे आणि अपिल दाखल करुन घेण्याचा विवेकाधिकार न्यायालयास दिलेला आहे. हा विवेकाधिकार न्यायालयास न्यायधिकार आणि विवेकाधिकार स्पष्ट न्याय देता यावा यासाठी जाणीवपूर्वक दिलेला आहे.

मद्रास उच्च न्यायालयाने कृष्णा विरुध्द चट्टप्पन ( **1890** ) J.L.R. 13 Mad.269, ''कलम ५ न्यायालयास एक विवेकाधिकार प्रदान करते जो की, न्यायाधिकारक्षेत्राबाबत अशा पध्दतीने वापरायचा आहे ज्यामध्ये सामान्यपणे मान्य तत्वांच्या आधारेच न्यायिक अधिकार आणि विवेकाधिकार यांचा वापर करणे आवश्यक असते, तिथे ''पुरेसे कारण'' या शब्दांचे विवेचन स्पष्ट न्याय मिळण्याच्या दृष्टीने उदारपणे केले जाते, जेंव्हा अपिलकर्त्यांकडून कोणतेही दुर्लक्ष किंवा अकार्यता किंवा सद्हेतू नसणे यापैकी कुठलेही कारण घडलेले नसते. ''

७.२ पी.के.रामचंद्रन प्रकरणात ५६५ दिवसांचा विलंब माफ करण्यात नकार देतांना असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, वाजवी, समाधानकारक किंवा विलंब माफीसाठी अगदी योग्य स्पष्टीकरणही दिलेले नसल्यास विलंब माफी सहजपणे केली न जावी. पुढे असेही निरीक्षण नोंदविण्यात आले की,मुदतीचा कायदा एखादया विशिष्ट पक्षकारासाठी अतिशय निष्ठुरपणे प्रभावित करणारा असेलही मात्र हा कायदा लागू करतांना संविधी मध्ये विहित केल्याप्रमाणेच लागू केला पाहिजे आणि न्यायालयाला मुदतीचा कालावधी समन्यायिक( Equitable ) आधारावर वाढविण्याचा कोणताही अधिकार नाही. पुढे असेही निरीक्षण नोंदविण्यात आले की, उशिरमाफीसाठी विवेकाधिकाराचा वापर न्यायालयाने करतांना न्यायिकपणेच केला पाहिजे.

७.३ पुंडलिक जालम पाटील प्रकरणात ( उपरोक्त ) खालील निरीक्षण नोंदविण्यात आलेले आहे.

''मुदतीचा कायदा हा सार्वजनिक धोरणावर आधारलेला आहे. मुदतीचे संविधी यांना बराचवेळा ''शांतीचे संविधी'' असेही म्हटले जाते. मुदतीचा अमर्याद आणि कायमचा ाक हा असुरक्षितता आणि अस्थिरता निर्माण करतो, त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी या ना त्या प्रकारची मुदतीची मर्यादा आवश्यक आहे. "interest reipublicae ut sit finis litium" या उक्तीवर हे तत्व आधारलेले आहे अर्थात राज्याचे हितसंबंधासाठी वादाला कुठतरी अंत असणे आवश्यक आहे मात्र मुदतीचे कायदे हे फसवणूक व खोटी साक्ष देण्याच्या वृत्तीला आळा, दक्षता गतिमान करणे आणि दडपशाहीला प्रतिबंध करुन निजी न्याय सुनिश्चित करण्याचे माध्यम आहेत. वादाला कालमर्यादा निश्चित करण्याचा उद्‌देश सार्वजनिक कल्याणाच्या उद्‌देशासाठी कायदेशीर उपायाची जिवनमर्यादा निश्चित करण्याच्या सार्वजनिक धोरणावर आधारलेले आहे. वादाचे पक्षकारांनी विलंबकारी डावपेच अवलंबण्यापेक्षा त्यांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर उपायांचा अवलंब करावा हा त्यांचा उद्‌देश आहे. आपल्या ''ज्युरिसप्रुडन्स'' या ग्रंथात सालमंड विधान करतो की, कायदे हे दक्ष व्यक्तीच्या सहाय्यासाठी असतात न कि निष्काळजी व्यक्तीसाठी''.

७.४ उपरोक्त बसवराज प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे व निर्णय घेतला आहे की, उशिर माफ करण्याचा विवेकाधिकार हा प्रकरणपरत्वे तथ्ये आणि परिस्थिती यांच्यावर आधारित न्यायिकपणे वापरलेला असावा. तसेच पुरेसे कारण ही अभिव्यक्तीचे विवेचन जर एखादया पक्षाला निष्काळजी, अकृती किंवा सद्‌हेतूविषयक दोषी ठरवत असेल तर उदारपणे करता येणार नाही. तसेच जरी कालमर्यादा एखादया पक्षाच्या अधिकारांवर तीव्र दुष्परिणाम करित असला तरी जेंव्हा संविधीने विहित केले

असेल तेंव्हा पूर्णपणे लागू केली जावी. तसेच असे पुढे निरीक्षण नोंदविण्यात आले की जर एखादया प्रकरणात एखादा पक्षकार निष्काळजीपणे वागला असेल किंवा सद्‌हेतू नसेल किंवा अकृती घडली असल्यास अशा प्रकरणात अटी लादूनही उशिरमाफी करणे न्यायोचित ठरत नाही. उशिरमाफीचा प्रत्येक अर्ज या न्यायालयाने आखून दिलेल्या मांडणीतच अभिनिर्णीत व्हावा तसेच ज्या प्रकरणात उशिरमाफीसाठी पुरेसे कारण नसेल त्यातही न्यायालयांनी अटी लादून उशिरमाफी करणे हे वैधानिक तत्वांचा भंग करणारे असून विधीमंडळाबद्‌दल अनादर दाखविणारे आहे.

७.७ उपरोक्त पुंडलिक जालम पाटील प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की, समानाधिकाराच्या कारणावर न्यायालय दिरंगाई झालेल्या व शिळया दाव्यांची चौकशी करु शकत नाही. उशिर हा समानाधिकाराला पराभूत करत असतो. न्यायालय ''आपल्या अधिकारांविषयी निद्रिस्त असलेल्यांना नाही तर जे दक्ष आहेत त्यांचेच सहाय्य करते.''

८. उपरोक्त निर्णयामध्ये या न्यायालयाने निश्चित केलेला कायदा, या प्रकरणातील तथ्यांना लागू केल्यानंतर आणि उशिर माफीच्या अर्जामध्ये केलेल्या विधानांना लक्षात घेता, आमचे असे मत झाले आहे की, प्रतिवादी १ आणि २ व उच्च न्यायालयातील अपिलार्थी यांनी दुसरे अपील दाखल करण्यास १०११ दिवसांच्या विलंबाबद्दल समाधानकारक किंवा पुरेसे स्पष्टीकरण दिलेले नाही. उच्च न्यायालयाचा इतका प्रचंड विलंब माफ करतांना केलेला विवेकाधिकाराचा वापर हा अजिबात समर्थनीय नाही. उच्च न्यायालयाने विवेकाधिकाराचा वापर न्यायिकयपणे केलेला नाही. उच्च न्यायालयाने १०११ दिवसांचा विलंब माफ करतांना केलेली कारणमीमांसा सुसंगत नाही. त्यामुळे यातील प्रतिवादी कमांक १ आणि २ - मुळ प्रतिवादी यांनी दुसरे अपील दाखल करण्यासाठी केलेला १०११ दिवसांचा विलंब माफ करण्यात उच्च न्यायालयाने चूक केलेली आहे. उच्च न्यायालयाने दिलेला

*आरोपाधीन आदेश हा - तथ्ये आणि कायदा - दोन्हींच्या दृष्टीने टिकणारा नाही* *(unsustainable).*

*दुस–या अपिलाला प्राधान्य देण्यासाठी १०११ दिवसांचा मोठा विलंब, एवढा मोठा विलंब माफ करण्यासाठी उच्च न्यायालयाचा अधिकार वापरणे अजिबात न्याय्य/उचित नाही. उच्च न्यायालयाने विवेकबुद्धीपूर्वक निर्णय घेतलेला नाही. १०११ दिवसांचा विलंब माफ करतांना उच्च न्यायालयाने दिलेला तर्क विषायाला धरुन नाही. त्यामुळे, मुळ प्रतिवादी- प्रतिवादी क. १ व २ यांच्या अपिलाला प्राधान्य देण्यासाठी उच्च न्यायालयाने १०११ दिवसांचा मोठा विलंब माफ करण्यात चूक केली आहे. हायकोर्टाने उच्च न्यायालयाने दिलेला अंतरिम आदेश कायदयानुसार आणि वस्तुस्थितीनुसार न टिकण्याजोगा आहे.*

*१६) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या या* ***<u>ईशा भट्टाचार्यजी विरुध्द व्यवस्थापकीय समिती रघुनाथपूर नाफर अकादमी आणि इतर</u>*** *यावर भर दिला असून ज्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने विलंब माफ करण्याच्या अर्जाला लागू होणारी तत्वे वेगळी काढली असून या निकालाचे परिच्छेद १५ व १६ मध्ये असे म्हटले आहे की,*

*२१) उपरोक्त अधिका–यांकडून काही तत्वे व्यापक प्रमाणावर वेगळी काढली गेली आहेत ती अशी...*

*२१.१)(१) विलंब माफीचा अर्ज हाताळतांना उदारमतवादी, व्यवहारवादी, न्यायाभिमुख अनौपचारीक असा दृष्टीकोन असावा. कारण न्यायालयांनी अन्याय दूर करणेस बांधील असावे, कायदेशीर अन्याय करणेस नव्हे.*

२१.२)(२) 'पुरेसे कारण' ही संज्ञा तिच्या मुलत: तत्वज्ञान, उद्दीष्ट यानूसार समजून घेतली पाहिजे. ही संज्ञा मुलत: लवचिक आहे. आणि वस्तुस्थिती प्राप्त करण्यासाठी योग्य त्या दृष्टीकोनातून लागू केली गेली पाहिजे.

२१.३)(३) सर्वांगिण न्याय हा सर्वोपरी आणि महत्वाचा आणि निर्णायक असल्या कारणाने तांत्रिक बाबींवर अवाजवी आणि अवास्तव भर दिला जाऊ नये.

२१.४)(४) विलंबाच्या कारणास जाणिवपुर्वक कोणतेही गृहीतक जोडले जाऊ शकत नाही. परंतू वकिलाकडून अथवा याचिका कर्त्याकडून गंभीर निष्काळजीपणा सुद्धा लक्षात घेतला पाहिजे.

२१.५)(५) विलंब माफी मागू पाहणा–या पक्षांसाठी प्रामाणिकपणाचा अभाव ही एक महत्वपूर्ण व संबंधीत वस्तूस्थिती आहे.

२१.६)(६) हे नेहमी लक्षात असावयास हवे की, कठोर पुराव्याचे पालन केल्याने सार्वजनिक न्यायावर कोणताही परिणाम होऊ नये. व सार्वजनिक गैरसोय होऊ नये कारण न्यायालयांनी सवर्क राहणे आवश्यक आहे की जेणेकरून अंतिम परिस्थितीत न्यायाचे अपयश होऊ नये.

२१.७)(७) उदारमतवादी दृष्टीकोन हया संकल्पनेत वाजवीपणाची संकल्पना अंतर्भूत असणे आवश्यक आहे आणि तो पूर्णपणे निर्दोष व मुक्तपणे परवानगी देणारा नसावा.

२१.८)(८) अवास्तव विलंब आणि कमी कालावधीचा विलंब यांत फरक आहे. कारण अवास्तव विलंबास पुर्वग्रहाचा सिद्धांत आकर्षित होतो तर नंतरच्या

विलंबास तो आकर्षित होऊ शकत नाही. या व्यतिरिक्त प्रथम विलंबास कठोर दृष्टीकोन आवश्यक आहे तर दुस—यांस उदारमतवादी दृष्टीकोनाचे चित्रण हवे.

२१.९)(९) पक्षकारांची वर्तन वृत्ती, त्यांच्या निष्क्रीयतेशी किंवा निष्काळजीपणाशी संबंधित घटक विचारात घेतले पाहिजेत. हे इतके मुलभूत तत्व आहे की, न्यायायलयाने दोन्ही पक्षांच्या संदर्भात न्याय संतुलनाचे मोजमाप करणे आवश्यक आहे. आणि उदारमतवादी दृष्टीकोनाच्या नावाखाली हे तत्व सरसकट लागू केले जाऊ शकत नाही.

२१.१०)(१०) जर दिलेले स्पष्टीकरण हे खोटे वा ज्या कारणास्तव दिले असेल ते कारण काल्पनिक असेल तर न्यायालयांनी अशा खटल्यांना सामोरे जाण्यासाठी अनावश्यकरित्या दुसरी बाजू उघडकीस आणू नये म्हणून दक्ष / सतर्क असावे.

२१.११)(११) हे लक्षात असू दयावे की, कोणीही फसवणूक करुन सूटणार नाही. तसेच कायदयाच्या तांत्रिकतेचा आधार घेऊन, चूकीचे वर्णन वा प्रक्षेपण करुन सूद्धा नाही.

२१.१२)(१२) संपूर्ण वस्तूस्थिती ही काळजीपूर्वक तपासली जाणे आवश्यक आहे. आणि दृष्टीकोन हा न्यायिक विवेकाच्या प्रतिमानावर आधारित असावा.तो वैयक्तिक धारणेवर आधारित नसावा तर वस्तूनिष्ठ तर्कावर आधारित असावा.

२१.१३)(१३) राज्य किंवा सार्वजनिक संस्था किंवा सामुहिक प्रतिनिधीत्व करणारी संस्था यांस काही स्विकार्य आचार विचारांचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

२२) वरिल काही तत्वांना अनूसरून आपण अजून काही मार्गदर्शक तत्वे त्यांत अंतर्भूत करू शकतो की जी आजच्या परिस्थितीनूसार समावेशक असतील. ती खालीलप्रमाणे-

२२.१) (अ) विलंब माफी अर्ज हा व्यवस्थितरित्या तयार केलेला असावा आणि पुर्वनियोजनाचा अभाव नाही या कल्पनेला आश्रय देणारा नसावा. दाव्याचा अभिनिर्णय गुणवत्तेवर होण्याच्या न्याय निर्वहन प्रणालीच्या तत्वाच्या अभंग अशा आधारावर अवलंबून आहे.

२२.२) (ब) विलंब माफी अर्ज हा वैयक्तिक तत्वज्ञानावर आधारित हाताळला जाऊ नये की जो आजतागायत हाताळला जात आहे आणि की जो मूळातच व्यक्तीनिष्ठ आहे.

२२.३) (क) न्यायीक अधिकार संकल्पनेबाबत कोणतेही अचूक सुत्र मांडले जाऊ शकत नाही, तरीही न्यायप्रणालीची सुसंगतता आणि सामुहिकता प्राप्त करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. कारण तेच हया न्यायसंस्थेचे अंतिम ध्येय आहे.

२२.४) (ड) विलंब ही बाब गंभीर नाही असे समजण्याच्या वाढत्या प्रवृत्तीला आणि म्हणूनच हया अभावग्रस्त प्रवृत्तीचे प्रदर्शन अविचारी पद्धतीने केले जाऊ शकते, अर्थातच कायदेशीर मापदंडामध्ये यांना आळा घालणे आवश्यक आहे.

१७) श्री. खांडेपारकर अशी विनंती करतील की उपरोक्त निवाडे प्रकरणातील तथ्यांसह चारही प्रणांवर आहेत कारण वादीने विलंब माफीसाठी विचारात

घेण्यासारखे स्पष्टीकरण दिलेले नाही.

१८) मुख्यत्वे हा विलंब माफीसाठी केलेला अर्ज आहे, मग तो अपिलाला प्राधान्य देण्यासाठी असो किंवा खटला चालवण्याची गरज नसलयामुळे कार्यवाही तहकुब करण्याच्या आदेशाला बाजुला ठेवण्यात यावे यासाठी असवा. तो उदारमतवादी दृष्टीने विचारात घेण्यासाठी योग्य आहे. विवेकबुध्दीच्या वापराची माहिती देणारे सर्वोत्कृष्ठ तत्व म्हणजे तांत्रिकता व चुकीच्या आधारे न ठरवता गुणवत्तेवर निर्णय घ्यावा जेणेकरून ठोस न्यायाचे कारण प्रगत करता येईल.

१९) या अर्थाने 'पुरेसे कारण' या शब्दाचा उदारमताने अर्थ लावला जातो. निसंशयपणे, अवास्तव विलंबामुळे पक्षांच्या स्थितीत बदल आणि त्रयस्थ पक्षांच्या हितसंबंधांची निर्मिती असे परिणाम होतात. अस्पष्ट आणि अवास्तव अशा प्रकारे न्यायालयास सावध करतो. असे असले तरी विलंबाचा कालावधी हा अधिकाराच्या वापरासाठी एकमेव व बदल दर्शवणारी गोष्ट ठरू शकत नाही. हे विलंबासाठी पुरेसे कारण आहे की जे महत्वाचे आहे.

२०) सदरच्या खटल्यात वादीच्या वतीने वकालनामा दाखल करणारे श्री साठे हे आजाराने ग्रस्त होते हे सिद्ध करणारे कागदपत्रे आहेत. श्री साठे यांच्या प्रतिज्ञापत्रात ही गोष्ट जाहीर असल्यामुळे ही परिस्थिती अवाजवी बनली आहे. निर्विवादपणे श्री साठे यांना २००६ मध्ये पक्षाघाताचा झटका आला होता. तरीही श्री साठे स्पष्टपणे सांगतात की, त्यांच्यावर उपचार सुरू होते आणि त्यांच्या उजव्या हाताला आणि उजव्या पायावर गंभीर परिणाम झाला आहे आणि त्यांना त्यांचा उजवा हात क्वचितच हलवता येत होता आणि त्यांना चालण्यातही अडचणी येत होत्या. श्री साठे यांनी पुष्टी केली की, ३१ऑक्टोबर २०१४ आणि १ ऑक्टोबर २०१५ रोजी ज्या दिवशी खटला

फेटाळला गेला त्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते न्यायालायात हजर राहू शकले नाही. आणि त्यांना या प्रकरणाचा मागोवा घेता आला नाही.

२१) श्री साठे यांचा दावा शब्दश: स्विकारला जावू नये असा आग्रह श्री खांडेपारकर दृढतेने करतील. खटला फेटाळण्याच्या तारखेच्या आसपासच्या तारखांना श्री साठे विविध न्यायालयांसमोर हजर झालेल्या आदेशांच्या प्रतींवर अवलंबून राहून श्री खांडेपारकर यांनी मुख्य मुद्दा काढण्याचा प्रयत्न केला की वादी ही परिस्थिती वाचवण्याचा चुकीचा प्रयत्न श्री साठे यांच्या आजारपणाचा आश्रय घेऊन करीत आहे.

२२) मला हे सादर केलेले कागदपत्रे स्वीकारावयास भीती वाटत आहे. श्री. साठे यांनी वरील प्रतीज्ञापत्रात नमुद केले आहे की, साठे यांना या प्रकरणाचा पाठपूरावा करतांना किती अडचणींना सामोरे जावे लागले. ज्या तारखेला हा खटला फेटाळला गेला होता त्या तारखेला श्री साठे इतर कांही कार्यवाहीत हजर झाले हे तथ्य अर्जदार/वादीने दिलेला कारण न्याय ठरत नाही. श्री साठे यांनी मान्य केलेप्रमाणे, खटला फेटाळण्यात आला असल्याने हे प्रकरण वकीलाच्या बाजुने अनावधानाने चूक झाल्याचे आहे.

२३) सर्वसामान्यपणे मानले जाते की, पक्षकाराने ज्या वकीलाला खटला सोपवला होता त्याच्या दोषामुळे किंवा चुकीमुळे पक्षकाराला त्रास होऊ नये, जेव्हा पक्षकार खटल्यात सहभागी होण्यासाठी सर्वकाही करतो, वकीलाला नेमतो व संक्षिप्त माहिती पुरवतो, त्याच्या वकिलाच्या बाजूने अनुपस्थिती झाल्याने त्याला शिक्षा करणे अन्यायकारक आहे. सर्वसामान्यतः न्यायालये विलंब माफी करण्याच्या आणि कार्यवाही पुर्नसंचयित करण्याकडे झुकतात की जेथे चुक ही पक्षकाराने नेमलेल्या वकिलाकडुन झालेले आहे असे दाखविणारे कागदपत्रे, असतात. अशी मान्यता सुप्रसिध्द तत्वाशी सहमत आहे की, ही प्रक्रिया ही न्यायाची दासी आहे, व तिला ठोस न्यायावर वरचढ

*होण्योची परवानगी दिली जाउ नये. खटला/केस हा तांत्रिक गुणदोषांवर न ठरवता तो गुणवत्तेवर ठरावा हेच सार्वजनिक न्यायाचे ठरेल.*

*२४) या संदर्भात उपयुक्त संदर्भ देता येईल तो असा- मा. सुप्रिम कोर्टाने या खटल्यात* **(सचिव, उद्यानविभाग, चंदीगढ व इतर विरूध्द रघुराज)** *केलेला न्यायनिवाडा की ज्यात वकिलाकडून झालेल्या चुकीमुळे पक्षास/पक्षकारांस त्रास देण्यात येऊ नये. परिच्छेद २३ ते २८ हे भौतिक स्वरूपाचे आहेत, म्हणून खाली दिलेले आहेत.*

> *"२३) आता, असे म्हणता येणार नाही की, वकिलाला त्याच्या अशिलाची केस सुनावणीसाठी येते तेव्हा न्यायालयात अनुपस्थित राहण्याचा अधिकार नाही. न्यायालयात उपस्थितीत राहून खटला चालवणे किंवा पर्यायी व्यवस्था करणे हे त्याचे कर्तव्य आहे. पुरेसा योग्य कारणाशिवाय कोर्टात हजर न होण्याला माफ करता येणार नाही, अशी अनुपस्थिती केवळ वकीलाच्या अशिलावरच अन्यायकारक नाही तर न्यायालयासाठीही अन्यायकारक आहे. आणि ती कधीही स्विकारली जाऊ शकत नाही."*
>
> *२४) तथापी, त्याचवेळी, जेव्हा पक्षकार एखादया वकिलाला नेमतो, की ज्याला सुनावणीच्या वेळी हजर राहणे अपेक्षित होते परंतु ते हजर राहण्यास अयशस्वी ठरतात, तेव्हा सामान्यतः पक्षकारास वकिलाच्या चूकीमुळे व गैरहजर असल्यामूळे नूकसान होऊ नये.*
>
> *२५)* ***रफिक वि. मुन्शीलाल*** *या खटल्यात उच्च न्यायालयाने अपीलकत्याने त्याच्या वकिलाच्या अनुपस्थितीत पसंत केलेले अपील निकाली काढले. वकिलाच्या अनुपस्थितीत आपले अपील निकाली काढण्यांत आल्याची वस्तुस्थिती*

अपिलकर्त्याला समजल्यावर त्याने अपील फेटाळण्याचा आदेश मागे घेण्यासाठी आणि अपिलाच्या सुनावणीत भाग घेण्याची परवानगी देण्यासाठी अर्ज दाखल केला हा अर्ज मात्र उच्च न्यायालयाने इतर बाबींसह फेटाळला, कारण वकिल हा अनुपस्थित राहिले याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण नाही. या प्रकरणी पीडीत अपिलकर्त्याने न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने दिलेला आदेश बाजूला ठेवून आणि कायदयानूसार प्रकरण नव्याने निकाली काढण्यासाठी अपीलाला परवानगी देऊन या न्यायालयाने म्हटले की, **(रफिक केस, सी सी पी.पी. ७८९.९० परिच्छेद ३.)**

“३) खटल्याचे त्रासदायक वैशिष्टय म्हणजे आमच्या सध्याच्या विरोधी कायदेशीर व्यवस्थेत जिथे पक्षकार सामान्यतः त्यांच्या वकिलांमार्फत न्यायालयात येतात. पक्षकार खेडूत असू शकतो किंवा ग्रामीण भागातील असू शकतो आणि त्याला न्यायालयाच्या प्रकियेबाबत कोणतीही माहिती नसू शकते. एखाद्या वकिलाची नियुक्ती केल्यावर, पक्षकार असा पूर्ण विश्वास बाळगू शकतो की वकील त्याच्या हितसंबंधाची काळजी घेईल. अपील सुनावणीच्या वेळी, पक्षकाराची वैयक्तिक उपस्थिती अनावश्यक तसेच अनपयुक्त सुद्धा आहे. त्यामुळे, कार्यवाहीमध्ये प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी आपल्या क्षमतेनुसार सर्वतोपरी प्रयत्न करणारा पक्षकार खात्री बाळगू शकतो की, त्याच्या अपिलाच्या संदर्भात उच्च न्यायालयात काय चालले आहे याची चौकशी करण्यासाठी त्याला उच्च न्यायालयात जाण्याची गरज नाही तसेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी बाबत वकिलाचे प्रहरी म्हणून काम करण्याची सुद्धा त्याला गरज नाही. हा त्यांच्या कामाचा भाग नाही. श्री. ए. के. संधी

म्हणाले की, अलाहाबाद उच्च न्यायालयात वकिलांमध्ये विशिष्ट खंडपीठ आवडत नसेल तेव्हा गैरहजर राहण्याची पद्धत वाढली आहे. कदाचित त्यांना याविषयी अधिक माहिती असेल.या संदर्भात अज्ञान हा आपला आनंद आहे. जर आपण अशा प्रवृत्तीला आळा घालून ही बाब फेटाळून लावून कथित पद्धतीवर शिक्कामोर्तब केले नाही तर न्याय व्यवस्थेची बदनामी होणार नाही का? ज्या पक्षकाराने आपल्या क्षमतेनुसार सर्वकाही केले आहे आणि वकिलाच्या चुकीमुळे त्याला त्रास होणार असेल, तर त्यात त्याचा काय दोष? श्री. ए. के. संधी यांनी सुचविल्याप्रमाणे जर आम्ही हे अपील फेटाळले, तर त्याचा फटका केवळ गैरहजर राहणार-या वकिलांनाच बसनार नाही, तर ते बाजू मांडत असलेल्या पक्षकारांच्या  हितसंबंधांनाही बसणार आहे.पक्षकाराला त्याच्या वकिलाच्या निष्क्रियतेमुळे, जाणीवपूर्वक केलेल्या चुकांमुळे किंवा चुकीच्या वागणूकीमुळे सहन करावा लागणारा त्रास, ही आपल्याला भेडसावणारी समस्या आहे. याचं उत्तर अर्थातच नकारार्थी आहे. कदाचित विद्वान वकील जाणीवपूर्वक किंवा हेतूपुरस्सर अनुपस्थित राहिला असेल. आमच्याकडे प्रकरणाच्या या पैलूची खातरजमा करण्यासाठी कोणताही पुरावा नाही. या विषयावर आम्ही अधिक काही बोलत नाही. मात्र, केवळ पक्षकाराने निवडलेल्या वकिलाने चूक केल्यामुळे निर्दोष पक्षकारावर होणार-या अन्यायाचा आपण एक पक्ष होऊ शकत नाही. म्हणून आम्ही हे अपील मान्य करुन, उच्च न्यायालयाचा अपील फेटाळण्याचा आणि तो आदेश मागे घेण्यास नकार देणारा आदेश बाजूला ठेवतो. आम्ही निर्देश देतो

की उच्च न्यायालयात अपील त्याच्या मूळ क्रमांकावर पुनर्स्थापित केले जावे आणि कायद्यानुसार ते निकाली काढले जावे.(भर देण्यात आला आहे).

२६. लाची तिवारी विरूध्द संचालक, भूमी अभिलेख यांच्या १९७६ मधील दाखल केलेल्या याचिकेत माननीय उच्च न्यायालयाने (रूल निसी) जारी केले होते. सात वर्षांनंतर हे प्रकरण १९८३ मध्ये तुर्त आदेशाच्या (रूल निसीच्या) सुनावणीसाठी ठेवण्यात आले. सुट्टीनंतर न्यायालये पुन्हा सुरू करण्याचा हा पहिलाच दिवस होता. याचिकाकर्त्याने तीन वकिलांची नियुक्ती केली होती. तथापी, जेव्हा हे प्रकरण सुनावणीसाठी पुकारण्यात आले तेव्हा त्यांच्यापैकी कोणीही हजर नव्हते. याचिकाकर्त्याची याचिका चालवण्यासाठी कोणीही हजर नसल्याने उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आणि नियम रद्द केला. याचिकाकर्त्याच्या वतीने आदेश मागे घेण्यासाठी आणि याचिका पुनर्स्थापित करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता, जो की फेटाळण्यात आला. याचिकाकर्ता या न्यायालयात आला. हा आदेश बाजूला ठेवून हे प्रकरण नव्याने निकाली काढण्यासाठी उच्च न्यायालयाकडे परत पाठवण्यात आले आहे आणि रफीक प्रकरणामध्ये नमूद केलेल्या कायदयाचा पुनरूच्चार करताना न्यायालयाने असे म्हटले आहे कीः

४." या याचिकेमध्ये कोणत्या मुदयाचा समावेश आहे यावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी केवळ तथ्यांचे वर्णन पुरेसे आहे. याचिकाकर्त्याने १९७६ मध्ये नियम निसी प्राप्त केला आणि त्याच्या सुनावणीसाठी सात वर्षे प्रतीक्षा केली. अचानक एक दिवस उच्च न्यायालयाने आपल्या दिनदर्शिकेनुसार या प्रकरणाची

सुनावणी २७ एप्रिल १९८३ रोजी निश्चित केली. याचिकाकर्त्याने तीन विद्वान वकिलांना नियुक्त करण्याची अतिरीक्त सावधगिरी बाळगली होती. त्याच्याकडून आणखी काय अपेक्षा करता येतील हे पाहण्यात आपण अपयशी ठरलो. याव्यतिरिक्त, या प्रकरणात सुनावणी न होताच आपण बाहेर पडू नये हे टाळण्यासाठी आणखी काय पावले उचलायला हवी होती हे समजण्यात आम्ही अपयशी ठरलो."

२७. मंगीलाल विरुद्ध मध्य प्रदेश सरकार, या प्रकरणात अधिवक्ता संपामुळे याचिकाकर्त्याचे वकील उपस्थित न राहिल्याने संपरिक्षा न्यायालयाने नोंदवलेल्या दोषसिध्दी निर्णयाविरोधात केलेली अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. उच्च न्यायालयाने अपील फेटाळणे अयोग्य असल्याचे या न्यायालयाने म्हटले आहे. ही याचिका पुनर्स्थापित करून दाखल करण्याचे आणि गुणवत्तेवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. (पहाः ताहिल राम इसारदास सदरनगनी वि. रामचंद इसारदास सदरनगनी ७)

२८. वरील संदर्भित निर्णयविधी वरून हे स्पष्ट होते की, जेव्हा जेव्हा या प्रकरणाची सुनावणी होईल तेव्हा या न्यायालयाने वकिलांना हजर राहण्याचा आणि युक्तिवाद करण्याचा आग्रह धरला आहे. असे करण्यात अपयशी ठरणे आणि त्यात सुट देणे कठोरपणे नाकारले पाहिजे. याचबरोबर, दोन्ही पक्षांनी न्यायालयात हजर राहून त्यांची बाजू मांडणे व त्यांचे म्हणणे ऐकणे योग्य आहे अशा कारणास्तव न्याय करण्यावर न्यायालयाने भर दिला आहे.

न्यायालयाने असे नमूद केले आहे की एकदा एखादा पक्षकार एखादया वकिलाची नियुक्ती करतो, तेव्हा त्याला वाटते की जेव्हा खटला सुनावणीसाठी घेतला जाईल तेव्हा त्याचा अधिवक्ता उपस्थित राहतील आणि न्यायालय वकिलाला निवेदन करण्यास सांगेल.

ही तत्वे लक्षात घेऊन न्यायालय अधिवक्त्यांच्या अनुपस्थितीत प्रकरणाची सुनावणी करत नाहीत. "(यावर भर देण्यात आला आहे)"

२५. निःसंशयपणे, १५०३ दिवसांचा विलंब, एका अर्थाने अवाजवी आहे. तथापी, या प्रकरणातील तथ्यांवर वरील तत्वांचा अवलंब करताना, माझ्या मते, अर्जदार/वादी यांनी विलंब माफ करण्यासाठी पुरेसे कारण दिले आहे. खटला पुर्नस्थापित करून प्रतिवादींना या कालावधी मध्ये होणारी गैरसोय आणि बाधा योग्य तो खर्च देऊन त्याची भरपाई केली जाऊ शकते.

२६. करिता आदेश खालील प्रमाणेः

## आदेश

१) अंतरिम अर्ज मान्य करण्यात येत आहे.

२) अर्ज करण्यास झालेला विलंब माफ करण्यात आला आहे.

३) दावा न चालवल्यामुळे दावा खारीज करण्याचा १५ ऑक्टोबर २०१५ चा आदेश बाजूला सारण्यात येत आहे व खर्चापोटी प्रति पक्षकार रू. १०,०००/- (एकूण खर्च ४०,०००/-) तीन आठवडयांच्या आत भरण्याच्या आधीन राहून दावा क्रं ३३५०/२००९ पुनर्स्थापित करण्यांत येत आहे.

४) वादीने उपरोक्त कालावधीत खर्च भरला नाही तर हा आदेश मागे घेतला जाईल आणि ०१ ऑक्टोबर २०१७ रोजीचा दावा रद्द करण्याचा आदेश न्यायालयाला अधिक संदर्भ न देता पुनर्स्थापित केला जाईल.

५) अंतरिम अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

.......